**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत संयुक्तपणे भारत इनोव्हेट्स या उपक्रमाचं उद्घाटन करणार

- भू-राजनैतिक संघर्ष आणि रुपयाच्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून ६२ हजार ८५३ कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक काढून घेतली

- इराण - अमेरिका शांतता कराराव आज स्वाक्षऱ्या होणार असल्याचा डोनाल्ड ट्रम्प  यांचा दावा इराणने फेटाळला

**आणि**

- महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात काल रात्री फ्रान्समधील नीस इथं पोहोचले. तिथे आयोजित स्वागत समारंभात, तिथल्या भारतीय समुदायानं त्यांचं मोठ्या उत्साहात स्वागत केलं. यावेळी मोठ्या संख्येनं भारतीय समुदायाचे सदस्य उपस्थित होते. या स्वागताबद्दल प्रधानमंत्र्यांनी भारतीय समुदायाचे आभारही मानले. हा आपल्यासाठी अविस्मरणीय क्षण होता, घरापासून हजारो किलोमीटर दूर असूनही, भारतीय समुदायाचं भारतासोबतचं नातं तसंच दृढ आहे अशी भावना त्यांनी समाजमाध्यमावरून व्यक्त केली आहे.

आपल्या या दौऱ्यात प्रधानमंत्री फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत संयुक्तपणे भारत इनोव्हेट्स या उपक्रमाचं उद्घाटन करतील. या उपक्रमाअंतर्गत देशभरातली सुमारे १२० स्टार्टअप्स जागतिक गुंतवणूकदार आणि

तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या व्यक्तिमत्वांसमोर आपल्या नवोन्मेषी कल्पना मांडतील. त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चा होईल. या बैठकीत संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार आणि नवोन्मेष या क्षेत्रांमधलं परस्पर सहकार्य आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. यानंतर प्रधानमंत्री स्लोव्हाकियासाठी रवाना होतील.

**<><><><><>**

भारतीय लष्करानं बदलत्या सुरक्षा आव्हानांशी आणि तांत्रिक प्रगतीशी जुळवून घेत भविष्यासाठी सज्ज राहण्याची गरज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली. डेहराडून इथल्या आयएमए अर्थात इंडियन मिलिटरी अकादमीमध्ये १५८ व्या नियमित आणि १४१ व्या तांत्रिक अभ्यासक्रमाच्या दीक्षांत संचलन सोहळ्यामध्ये त्या बोलत होत्या. अधिकारी प्रशिक्षणार्थींनी आयुष्यभर शिकण्याची वृत्ती, नैतिक मूल्यं आणि धैर्यपूर्ण नेतृत्व जोपासावं, असं आवाहन त्यांनी केलं. देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेचं रक्षक म्हणून जबाबदारी पार पाडण्याचा सल्लाही त्यांनी दिला. संचलनामध्ये नऊ महिला प्रशिक्षणार्थींचा समावेश हा आयएमएच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचं सांगत त्यांनी सर्व नवोदित अधिकारी आणि मित्र राष्ट्राच्या प्रशिक्षणार्थींचंही अभिनंदन केलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढता भू-राजनैतिक तणाव आणि रुपयाची होणारी घसरण या पार्श्वभूमीवर परदेशी भांडवली गुंतवणूकदारांनी जूनच्या पहिल्या पंधरवड्यात भारतीय शेअर बाजारातून ६२ हजार ८५३ कोटी रुपयांहून अधिक रक्कम काढून घेतली आहे. 'एनएसडीएल', अर्थात, नेशनल सिक्योरिटीज डिपॉजिटरी लिमिटेडनं दिलेल्या आकडेवारीनुसार चालू वर्षात परदेशी भांडवली गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून आता पर्यंत २ लाख ८७ हजार कोटी

रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. २०२५ मध्ये एक लाख ६६ हजार रुपयांची निर्गुंतवणूक झाली होती, त्या तुलनेत ही रक्कम जास्त आहे.

<><><><><>

केंद्र सरकारनं कामगार सांख्यिकीसंबंधी उच्चस्तरीय तांत्रिक तज्ज्ञ समितीच्या अध्यक्षपदी प्रख्यात अर्थतज्ज्ञ, प्राध्यापक अलख शर्मा यांची नियुक्ती केली आहे. भारतातल्या कामगार बाजाराची बदलती रचना अभ्यासणं, तसंच, कामगार बाजाराशी संबंधित निर्देशांक अधिक सक्षम करणं आणि त्यांचा नियमित आढावा घेणं, या उद्देशानं या समितीची स्थापना केली आहे. ही समिती अधिक सूक्ष्म, वेळेवर उपलब्ध होणारी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तुलना करता येईल, अशी कामगार सांख्यिकी विकसित करण्यावर विशेष भर देणार आहे.

<><><><><>

अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीयांचा मृत्यू झाल्यानंतरही केंद्र सरकारने अमेरिकेचा निषेध केला नाही असा आरोप करत लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. प्रधानमंत्र्यांनी अमेरिकेचा निषेध न करुन देशाच्या गौरवाला बाधा आणल्याचं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीयांचा मृत्यू झाल्यानंतर अमेरिकेने होर्मुर्जच्या सामुद्रधूनीमधून इराणशी संबंधित कोणत्याही प्रकारची तेल वाहतूक खपवून घेतली जाणार नसल्याचं भारताला कळवलं आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं काँग्रेसऐवजी भाजपाप्रणित रालोआमध्ये सहभागी व्हावं, असं केंद्रीय मंत्री आणि रिपाइं प्रमुख रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्षाच्या काँग्रेसमध्ये संभाव्य विलीनीकरणाच्या अटकळींच्या पार्श्वभूमीवर आठवले यांनी आपलं मत व्यक्त केलं आहे. काँग्रेस पक्ष आता दुबळा झाला असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

रक्तदान हे एखाद्याला जीवनाची दुसरी संधी द्यायचा सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग असल्यानं नागरिकांनी पुढाकार घेऊन रक्तदान करावं असं  आवाहन आजच्या जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्तानं केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी केलं आहे. रक्तदानाबाबतच्या गैरसमजूती दूर करून त्याचं महत्त्व जनमानसात रुजवायची गरज त्यांनी व्यक्त केली. ‘एक थेंब माणुसकीचा’ ही या वर्षीच्या रक्तदाता दिनाची संकल्पना असून सुरक्षित रक्त आणि रक्तघटकांची गरज याबाबत जनजागृती करण्यासाठी आणि स्वेच्छेनं तसंच विनामूल्य रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांच्या जीवनरक्षक योगदानाबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी दरवर्षी १४ जून रोजी हा जागतिक रक्तदाता दिन साजरा केला जातो.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जागतिक रक्तदाता दिनानिमित्त देशभरातील नागरिकांना स्वेच्छेनं रक्तदान करण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

इराण - अमेरिका युद्ध संपवण्याकरता आज शांतता करारावर स्वाक्षऱ्या केल्या जाणार असून यानंतर होर्मुजची सामुद्रधुनी वाहतुकीसाठी खुली होणार असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं  आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता स्थापन करण्यासाठीच्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात असल्याचं पाकिस्ताननं सांगितलं होतं, त्यानंतर अमेरिकेच्या अध्यक्षांनी हे वक्तव्य केलं आहे.

दरम्यान, कोणताही करार त्वरित होण्याची शक्यता नसल्याचं इराणच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी म्हटलं आहे. कदाचित आगामी दिवसांत करार होऊ शकेल, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

<><><><><>

म्यानमारमध्ये काल रात्री भूकंपाचा तीव्र धक्का बसला. रिश्टर स्केलवर तीन पूर्णांक आठ इतकी या भूकंपाची तीव्रता नोंदली गेली अशी माहिती तिथल्या राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानं दिली आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार काल रात्री अकरा वाजून एकतीस मिनिटांनी भुकंपाचे धक्के बसले. या भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली दहा किलोमीटर खोल होता अशी माहितीही भूकंपशास्त्र केंद्रानं दिली आहे. याधी एका आठवड्यापूर्वी देखील म्यानमारमध्ये तीन पूर्णांक पाच तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला होता.

**<><><><>**

चंद्रावरील अत्यंत थंड वातावरणाचा सामना करू शकणारी प्रगत कृत्रिम उष्णता प्रणाली विकसित करण्यासाठी इस्रो आणि अणुऊर्जा विभागाने संयुक्तपणे काम सुरू केलं आहे. बंगळुरू इथं झालेल्या एका परिषदेत इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांनी ही माहिती दिली. चांद्रयान-3 मोहिमेतील विक्रम लँडर सौरऊर्जेवर आधारित असल्याने तो चंद्रावर केवळ १४ दिवस कार्यरत राहू शकला होता. आता नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने २०० दिवसांपर्यंत कार्यक्षम राहणारा लँडर विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. कृत्रिम उष्णता प्रणालीमुळे चंद्रावरील उणे १२९ अंश ते १२१ अंश सेल्सिअस तापमानातील तीव्र बदलांचा सामना करणे शक्य होणार आहे. तसेच इस्रो आणि सीएसआयआरने तांत्रिक सहकार्यासाठी ४० क्षेत्रे निश्चित केली असून त्यापैकी १७ प्रकल्पांच्या अंमलबजावणीला मंजुरी देण्यात आली आहे.

**<><><><>**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अ गटात, बर्मिंगहॅम इथं भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता या सामन्याला सुरुवात होईल. स्पर्धेतला हा भारताचा सलामीचा सामना आहे. अ गटात भारत आणि

पाकिस्तानसोबत ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नेदरलँड आणि दक्षिण आफ्रिका या संघांचा समावेश आहे.

स्पर्धेत आज बर्मिंगहॅम इथंच अ गटात बांगलादेश आणि नेदरलँड यांच्यातही सामना होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३ वाजता हा सामना सुरू होईल.

दरम्यान काल झालेल्या सामन्यांमध्ये ब गटात स्कॉटलंडनं आयर्लंडवर ४० धावांनी विजय मिळवला, तर वेस्ट इंडिजनं न्यूझीलंडच्या संघावर सात गडी राखून मात केली. अ गटात झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं दक्षिण आफ्रिकेवर ६५ धावांनी विजय मिळवला.

**<><><><><>**

फिफा फूटबॉल स्पर्धेत ऑस्ट्रिलिया आणि तुर्किए यांच्या सामन्यात मध्यंतरापर्यंत ऑस्ट्रेलियाने १-० अशी आघाडी घेतली आहे. नेस्तोरी इरानकुंडाने मध्यंतराच्या आधी  गोल करून ऑस्ट्रिलियाला आघाडी मिळवून दिली.

स्पर्धेतल्या दुसऱ्या सामन्यात स्कॉटलंडने हैतीवर १-० अशी मात करून विजयाचं खातं उघडलं. तर ब्राझीलला मोरोक्कोने १-१ असं बरोबरीत रोखलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात वाशिम जिल्ह्यात काल तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला. मानोरा तालुक्यातील फुलउंबरी धरणात काल सकाळी पुसद इथल्या१८ वर्षांचा तरुणाचा बुडून मृत्यू झाला, तर वैद्यकीय प्रवेश निश्चित झालेल्या एका २२ वर्षांच्या विद्यार्थ्यानं वडिलांसमोरच दुपारी अडाण धरणात उडी घेतली. तर तिसऱ्या एका घटनेत मालेगाव तालुक्यातल्या तिवळी इथं एका कुटुंबातल्या दोन लहानग्यांसह पती-पत्नीचे मृतदेह शेतात आढळले.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस येत्या दोन तीन दिवसात  कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि ओदिशा तसचं छत्तीसगडच्या दक्षिणेकडील भागात सक्रीय होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. ईशान्येकडील काही भाग, अंदमान आणि निकोबार बेटे, केरळ, माहे, ओदिशा, तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईल भागात जोरदार पाऊस पडणार असून मध्य प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थानच्या पश्चिम भागात उद्यापर्यंत ढगांचा गडगडाट होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या काही भागात उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता असून कोकण, गोवा भागात आद्रता वाढणार असल्याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

//<><><><><>//